**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः अस्मित गजानन रणदिवे,

वयः ३३ वर्षे, व्यवसायः केबल ऑपरेटर,

राहणारः भुवनेश्वर, ता.रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :</u>**

०१. दि.२५.१२.२०१८ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नवहते. सदर दिवशीचे निवेदन पंचनाम्यावर माझी सही आहे, परंतू त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.१२.२०१८ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच राहुल खराडे याला पोलीस स्टेशन रोहा येथे पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते, तेथे आरोपीने गुन्हयात वापरलेला स्टीलचा कडा काढून देण्याबाबत आमचे समक्ष पोलीसांना निवेदन दिले होते, ते पोलीसांनी माझे समक्ष लिहून घेतले, त्यावर मी वाचून सही केली, सदर निवेदनानंतर आम्ही, आरोपी व पोलीस मिळून मौजे सुडकोली येथील आरोपीचे घरी गेलो होतो, तेथे आरोपीने हॉलमध्ये ठेवलेल्या कपाटामधून स्टील कडा आमचे समक्ष पोलीसांना काढून

दिला, सदर कडा पोलीसांनी ताब्यात घेऊन सिलबंद केला, त्या अनुषंगाने पोलीसांनी तेथे आमचे समक्ष मेमोरँडम पंचनामा तयार केला, त्यावर मी वाचून सही केली.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस ओळखतो, त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एच. पाटकर यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.08.01 18:24:39 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०१.०८.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.